चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
२० ऑगस्ट, २०१९

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची दारू तस्करी करणाऱ्याविरूध्द कार्यवाही

दिनांक २०/०८/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम एका चारचाकी होंडा सिटी वाहनाने पठाणपुरा मार्गे माना नांदगाव रोडने दारू वाहतुक करणार आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथकाने माना नांदगाव रोडवर नाकेबंदी लावुन वाहनाची प्रतिक्षा करीत असतांना मिळालेल्या माहितीप्रमाणे एक होंडा सिटी वाहन येतांना दिसले. सदर वाहनास थाबंविण्याचा प्रयत्न केला असता वाहन दुरवरच थांबवुन वाहनातील इसम पळु लागल्याने पोलीस पथकाने पाठलाग करून एका इसमास ताब्यात घेतले. त्यास विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ४० पेटया देशी दारू किं. ४,००,०००/—रू चा माल मिळुन आला. यावरून आरोपी नामे मनोज पुंडलिक चंबुलवार वय ४० रा. नांदगाव पोडे यास अटक करण्यात आली असुन दारू वाहतुकीकरीता वापरलेली होडा सिटी क्र. एमएच ३१ बीबी ९८५९ किं. ३,००,००/—रू, आणि एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन किं. २,०००/—रू असा एकुण ७,०२,०००/—रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, पोउपनि. नागेश जायले, सफौ. पद्माकर भोयर, पोना. प्रकाश बल्की, पोशि सतिश बगमारे, नितिन रायपुरे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दिनांक १७/०८/२०१९ रोजी फिर्यादी नामे बाबा गोपाळराव बनकर रा. तिर्थरूप नगर चंद्रपुर हे आपल्या परिवारासह बाहेर गावी गेले असतांना रात्रो दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमांने त्यांचा घराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील चांदीचे दागीने, आर्टिफिशियल दागीने, मोबाईल, लपटॉप व नगदी असा माल चोरून नेला आहे. अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र १०२८/२०१९ कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयाच्या तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने माहिती गोळा करण्यास सुरूवात केली. तपासादरम्यान काही वेळातच माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील घरफोडीचा अट्ट्ल गुन्हेगार आरोपी नामे रोहीत आदेश ईलमकर रा. समतानगर दुर्गापुर हा लॅपटॉप व मोबाईल विकण्याकरीता भंगाराम वार्डात फिरत आहे. या माहितीवरून स्थागुशा पथकाने सापळा रचुन संशयावरून त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने कबुली दिली की, तिन दिवसापुर्वी रात्रो दरम्यान तिर्थरूप नगर येथे घरफोडी केली होती. यावरून आरोपी नामे रोहीत ईलमकर यास अटक करून त्याचे कडुन चोरीतील मुददेमाल आणि गुन्हयादरम्यान वापरलेली टीवीएस ज्युपीटर मोटारसायकल असा एकुण ५९,५००/—रू चा माल जप्त करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. डॉ. महेश्वर रेडड्ी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात, सपोनि. बोबडे, सफौ. पंडीत वऱ्हाटे, पोना. संजय आतकुलवार, अनुप डांगे, पोशि. प्रशांत नागोसे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————